# श्रमसंस्कारातून सामाजिक विचारांना समृध्दी - आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल (प्रतिनिधी) श्रमसंस्कारातून सामाजिक विचारांना समृध्दी मिळत असून 'भारत स्वच्छता अभियान' शिर्षकाखाली आयोजित करण्यात आलेल्या शिबीराचा बोध घेवून प्रत्येक शिबीरार्थीने सामाजिक जाणिव ठेवत कार्यरत रहावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (दि.०७) शांतिवन येथे केले.

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयातील विद्यार्थ्यासाठी दि.०७ ते १३ नोव्हेंबरपर्यंत नेरे येथील शांतीवनमध्ये राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आला आहे. या शिबीराचे उदघाटन त्यांच्या हस्ते आज करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर हे होते. त्याप्रसंगी आ. ठाकूर बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या समन्वय समितीचे सदस्य जी. आर. पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, शांतिवनचे प्रमुख कार्यवाह विष्णूप्रभू देसाई, कार्याध्यक्षा मिराताई लाड, इशासकीय अधिकारी रामदास गवई, विलास फडके, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य गणपती कोराणे, रजिस्ट्रार एस. के. राऊत, जे. व्ही. बोरगांवे, कार्यक्रम अधिकारी चिंतामण धिंदळे, प्रा. रामचंद्र पाटील यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, श्रमसंस्कारातून शरिराला व्यायाम व मनाला समाधान मिळत असते, त्यामुळे मानवी जीवनात श्रमसंस्काराला अत्यंत महत्व आहे. युवक-युवती देशाचा आधारस्तंभ आहे, त्यामुळे प्रत्येक युवक-युवतीने दुसऱ्याला मदत करण्याचा गुण अंगिकारला पाहिजे. देशाला समृध्दी मिळवून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे. या अभियानातून स्वच्छतेचा मंत्र जपत प्रत्येक विद्याथ्याने जबाबदारीने वाटचाल केली पाहिजे, असेही आ. ठाकूर म्हणाले. शालेय, महाविद्यालयीन जीवनातून अनेक उपक्रमांना तुम्ही सामोरे गेले आहात, त्यामुळे तुम्हाला अशा उपक्रमाचा थोडाफार अनुभव आहे. या अनुभवाचा फायदा तुमच्या गावाला, परिसराला झाला पाहिजे, त्याकरिता प्रत्येकाने सामाजिक जाणिव आणि श्रम व संस्काराच्या माध्यमातून तत्पर रहावे, त्यातून आत्मविश्वास निर्माण होवून उत्तुंग ध्येय्य साकारण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषण करताना सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबर श्रमसंस्कार, सामाजिक कार्याची आवड निर्माण करणे, त्यांच्यामध्ये सभा कौशल्य निर्माण करणे यासाठी राष्ट्रीय सेवा योजना खऱ्या अर्थाने उपयुक्त आहे. विशेष श्रमसंस्कार शिबीरातून स्वावलंबी विद्यार्थी घडण्यास मदत होत असते. विद्यार्थी हा समाजप्रिय झाला पाहिजे, त्यांच्यामध्ये सामाजिक समस्याची जाणीव तसेच त्यांना श्रमाचे महत्व पटले पाहीजे यासाठी अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन महत्वपूर्ण असून यामुळे समाज महत्वाची जाण होत असते, असेही त्यांनी सांगितले. शांतीवनमध्ये चांगली परंपरा आहे, त्यामुळे येथे आल्यावर मनाला प्रसन्नता लाभते, त्याचा फायदा घेवून शिबीरार्थींनी श्रम संस्कारातून शिकवण घेवून पुढील काळातही स्वच्छतेच्या बाबतीत दक्षता पाळावी, असेही त्यांनी म्हंटले.

यावेळी जी. आर. पाटील यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना श्रमसंस्काराचे महत्व पटवून दिले. ज्ञान, विज्ञानासोबत श्रमसंस्कार महत्वाचे असून कर्मवीर अण्णांचे पाईक म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी संस्कांर अंगिकारावे तसेच सहकार्याची भुमिका आत्मसात करावी, असेही त्यांनी सांगितले. 'भारत स्वच्छता अभियान' या शिर्षकाखाली ०७ ते १३ नोव्हेंबर या काळावधीत आयोजित करण्यात आलेल्या या शिबीरात जल व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छ भारत अभियान, व्यक्तीमत्व विकास, श्रमदान, पथनाटय, व्यक्तीगत विकास, गटचर्चा, वृक्ष संवर्धन, कथा कथन, पर्यावरण संवर्धन, मनोरंजनात्मक खेळ, आकाश दर्शन, शांतीवन भेट, वृध्दाश्रम स्वच्छता, ज्येष्ठ व्यक्तींशी गप्पा तसेच मान्यवरांची व्याख्याने आदी उपक्रम होणार आहेत.